महामेट्रोच्या भूमिगत मार्गाचे लवकरच काम सुरु होणार .

पुणे , १४ डिसेंबर २०१८ : आज महामेट्रोची किक -ऑफ बैठक घेण्यात आली . यामध्ये महामेट्रो पुणे मेट्रोच्या मार्गिका क्रमांक १ पीसीएमसी ते स्वारगेट ११.५७० किमी पैकी एकूण ५.०१९ किमी मार्ग हा भूमिगत आहे . भूमिगत मार्गाचे काम हे दोन विभागात , करण्यात येणार असून नुकतेच अग्रीकल्चर ग्राउंड ते फडके हौद या कामाची निविदा मंजूर करून टाटा व गुलेरमार्क या संयुक्त कंपनीला हे अवॉर्ड झाले आहे .

आज दि . १४.१२.२०१८ रोजी टाटा - गुलेरमार्क कंपनीची किक -ऑफ मीटिंगचे आयोजन करण्यात आले होते . या बैठकीत कश्याप्रकारे भूमीगत मार्गाची अंमलबजावणी करण्यात येइल याचा विस्तृत आराखडा महामेट्रोकडे सादर करण्यात आला आहे .या कामामध्ये टनेल बोरिंग मशीन वापरण्यात येणार आहेत . त्याबरोबरच पायरिंग रिग, ओव्हर हेड क्रेन , लोकोमोटिव्ह , हायड्रा इत्यादी मशीन वापरण्यात येणार आहेत . ही कंपनी लवकरच कास्टिंग यार्ड , ब्याचिंग प्लान्ट सुरु करणार असून या कामात ३३९२ रिंग वापरण्यात येणार आहे . या रिंगमुळे टनेलचा आकार एकसारखा ठेवण्यात येतो . या कामात जलद गतीने काम होण्यासाठी महामेट्रोने आधीच शाफ्टचे काम सुरु केले असून लवकरच ते पूर्ण होऊन टनेलच्या कामाला सुरवात होईल .

टाटा - गुलेरमार्क अधिकाऱ्यांनी सांगितले की त्यांची पूर्ण टीम निर्धारित झाली असून लवकरच टनेल बोरिंग मशीन खरेदी करण्यासंबंधी वर्क ऑर्डर ते देणार आहेत .या कामाची अंमलबजावणी करताना योग्य त्या सुरक्षतेसाठी सर्वोतोपरी प्रयन्त करण्यात येणार आहेत . या बैठकीत गुलेरमार्क चे प्रकल्प समन्वयक एम्रे कायटन आणि टाटा प्रकल्पाचे एच ओ डी शैबल रॉय आणि महामेट्रोचे कार्यकारी संचालक रामनाथ सुब्रमण्यम , भूमिगत मार्गाचे कार्यकारी संचालक अतुल गाडगीळ , महाव्यवस्थापक ( जनसंपर्क ) डॉ . हेमंत सोनावणे आणि जनरल कन्सल्टन्ट टीम चे प्रकल्प समन्वयक हुकूम सिंग चौधरी उपस्थित होते .